पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/ ५३२/२०१०
दिनांक- ३/०६/२०१०

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ८.०६.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ८.०६.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १७२

दिनांक- ८.०६.२०१० वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ८.०६.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी येथे निदेशक पदावर प्रस्तावात नमुद अनु. क्र.१ ते ९ कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशास आधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.१०/५/२०१० रोजी एक दिवस सेवाखंड देवून दि.११/५/२०१० ते दि.१०/११/२०१० पर्यंत सहा महिने कालावधीकरिता र.रू. ५,५००/- [र.रू.पाच हजार पाचशे] एकत्रित मानधनावर हंगामी नियुक्ती देणेस व अनु.क्र.१० ते १७ कर्मचाऱ्यांना दि.१०/५/२०१० रोजी एक दिवस सेवाखंड देवून दि.११/५/२०१० ते दि.१०/८/२०१० पर्यंत तीन महिने कालावधीकरिता र.रू. ५,५००/- [र.रू.पाच हजार पाचशे] एकत्रित मानधनावर हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१०-११ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा हद्दी बाहेरील वाकड येथील कासारसाई जकात नाक्यापासून आय टी पार्क हिंजवडीकडे जाणाऱ्या पर्यायी रस्त्यांचे मजबूतीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्र. प्रा.लि. (नि.र.रू.४१,१४,०१३/- [र.रू.एक्केचाळीस लाख चौदा हजार तेरा] पेक्षा २५.८६ % कमी) या ठेकेदारा बरोबर नियमानुसार व निविदेमधील अटी व शर्तीस अधीन राहून करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) लेखा विभागाकरिता आवश्यक असणारे ठेकेदार आयकर सॉफ्टवेअरचे सन २०१०-११ करिता Reinstallation चे कामकाज मे.SAG Infotech, Jaipur यांचेकडील ऑनलाईन वरील दरपत्रकानुसार तातडीने निविदा / कोटेशन न मागविता व करारनामा न करता थेट पध्दतीने करणेस व त्याकामी येणारा खर्च र.रू.३,१५०/- [र.रू.तीन हजार एकशे पन्नास] यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) शासनमान्य दराने जाहीरात प्रसिध्द करणाऱ्या प्रस्तावात नमुद वृत्तपत्रांना मनपाच्या यादीवर घेण्यास व शासनमान्य दराने जाहीराती वितरीत करण्यास तसेच जाहीरात रोटेशन ठरवण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास तसेच प्रस्तावात नमुद प्रमाणे अ.क्र.१ ते ९ यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) मनपाचे विद्युत विभागासाठी बॅलास्ट (अटम क्र.४) साहित्य खरेदीकामी ई-नि.क्र.१०/२-२०१०/११ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.धूपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि., पिंपरी यांचे बॅलास्ट (अटम क्र.४) साहित्याचे दर प्रति नग र.रू.९०/- प्रमाणे १००० नगाचे एकूण र.रू.९०,०००/- स्विकृत करून, करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ६) इंद्रायणी नदी पात्रातील जलपर्णी / हायसिंथ काढणेकामी मे.श्री. असोसिएट्स, चिंचवड यांचे प्राप्त दरानुसार टप्पा क्र.१ कामासाठी र.रू.९,८७,१४९/- व टप्पा क्र.२ कामासाठी र.रू. ८,६०,२२४/- खर्च होणार असून याकरीता क प्रभागचे संबंधीत लेखाशिर्षावरती तरतूद कमी असलेने त्याच प्रभागातील कचरा व राडारोडा वाहतूक करणे या लेखाशिर्षावरून र.रू. १७,००,०००/- हायसिंथ काढणे या लेखाशिर्षावर वर्ग करून याकामी खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) विकास योजनेतील मौजे चोवीसावाडी येथील स.नं.३९, ३८, ९२ मधील १८.० मी. रस्त्याने खाजगी मिळकती बाधीत होत असल्याने सदर रस्त्याने बाधीत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतूदी अंतर्गत भूसंपादनास व याकामी येणाऱ्या खर्चास (संबंधीत भूमि संपादन विशेष अधिकारी कळवतील ती रक्कम) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) मुख्य प्रशा इमारत या लेखाशिर्षातील प्रस्तावात नमुद झालेल्या कामांचे बिल अदायगी करणेसाठी त्याच लेखाशिर्षातील इतर कामातील तरतुदीचे रकमेत घट करून प्रस्तावात नमुद कामांचे तरतुदीत वाढ करणेस प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, थेरगांव बोटक्लब उद्यान, थेरगांव येथील मिनी रोड ट्रेन भाडेतत्वावर चालविणेकामी मे.मोरया एंटरप्रायजेस (र.रू.२७,०००/- प्रति वर्ष भाडे) यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१,८६,०००/- [र.रू.एक लाख शहाऐंशी हजार])

विषय क्रमांक- ११) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१०-११ मधील अ.क्र.१ अन्वये, क प्रभाग अंतर्गत येणारे नाले साफसफाई करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (र.रू. ७७/- प्रति घनमीटर) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.
(नि.र.रू. ९,९०,०००/- [र.रू.नऊ लाख नव्वद हजार])

विषय क्रमांक- १२) मनपाच्या वतीने दि.१५/६/१० ते १७/६/१० या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर जयंती कार्यक्रमासाठी नाट्यगृह भाडे, निमंत्रणपत्रिका, फ्लेक्स बॅनर हार, गुच्छ व इतर किरकोळ खर्च यासाठी थेट पध्दतीने करण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(अपेक्षित खर्च र.रू. ८६,०००/- [र.रू.शहाऐंशी हजार])

विषय क्रमांक- १३) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१०.५.२०१० ते १६.५.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४९/२०१० दि.२.६.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १४) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१७.५.२०१० ते २३.५.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/५०/२०१० दि.२.६.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १५) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र ‘अ’ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १६) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००८-०९ मधील अ.क्र.१ अन्वये, ड प्रभागातील वॉर्ड क्र.७५ येथील पिंपळे सौंदागर ते काटेवस्ती या रस्त्यांचे रूंदीकरण करणेकामी मे.साईप्रभा कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२७,००,०००/- [र.रू. सत्तावीस लाख] पेक्षा ४०.३२ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.१६,११,३६०/- [र.रू.सोळा लाख अकरा हजार तीनशे साठ] पर्यंत काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १७) तालेरा रूग्णालय, चिंचवड येथील वीज पुरवठ्याकरीता असलेल्या APFC पॅनलचे तातडीने दुरुस्ती करणे हे काम वॉर्डस्तरीय योजने अंतर्गत सर्वात कमी दरधारक मे.भाग्यश्री इंटरप्रायजेस यांचेकडून करारनामा करून तातडीने करून घेणेस व सदर कामाचे र.रू.४९,७४१/- [र.रू.एकोणपन्नास हजार सातशे एक्केचाळीस] चे वॉर्डस्तरीय योजने अंतर्गत चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १८) वाय.सी.एम.रूग्णालयातील बायोमेडिकल इंजिनिअर यांना उपकरणे साहित्य दुरुस्ती करिता आवश्यक लागणारे साहित्याची खरेदी लघुत्तम निविदाधारक एम.के.एन्टरप्रायजेस यांचेकडून करारनामा करून खरेदीकामी येणाऱ्या र.रू. ५,७२,२४०/- [र.रू.पाच लाख बहात्तर हजार दोनशे चाळीस] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १९) मनपाचे वाय.सी.एम.रूग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरिता आवश्यक लागणारे ५ नग शॅडॉलेस लॅम्प शासन दर करारा नुसार म्हणजेच “Sir J J Group of Hospital Mumbai” यांना पुरवठा केलेले दरानुसार करारनामा करून प्रति नग र.रू.४,०९,९४०/- याप्रमाणे ५ नग फिलिप्स् कंपनीचे शॅडॉलेस लॅम्प O.T. Light Cold Beam Halogen Multi Point Model No.Phililux S५०+ Phililux S५० (S५० Duo) G Philips O.T. Lights मे.वैभव ट्रेडर्स यांचेकडून खरेदी करण्यास व येणाऱ्या र.रू.२०,४९,७००/- चे खर्चास तसेच सन १९९९ मध्ये खरेदी केलेले ३ नग शॅडॉलेस लॅम्प प्रतिनग र.रू. २०,०००/- प्रमाणे व सन २००३ मध्ये खरेदी केलेले २ नग शॅडॉलेस लॅम्प प्रतिनग र.रू.२५,०००/- प्रमाणे परत करणेस (Buy Back) मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/५३२/२०१०
दिनांक : ३/०६/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.